महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष
म.रा.वि.वि.कं.मर्यादित
प्रकाशगड, ४ था मजला
स्टेशन रोड, वांद्रे (पुर्व)
मुंबई ४०० ०५१.

**ई-मेल :- cgmle@mahadiscom.in**
**फॅक्स नं :- ०२२ - २६५८०६४२**

क्र.साप्रवि मु.म.व्य.(तां.आ)/मपुक/७६२४ दिनांक : **०८.०३.२०११**

# परिपत्रक

**विषय :** कारागिर "क" (मिटरवाचक/टेलिफोन अटेन्डट) यांना कनिष्ठ यंत्रचालकाच्या जागी सामावून घेण्याबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र. साप्रवि/मुनव्य (तां.आ.) मपुक/४४५४ दि. १०/०२/२०१०.

**प्रस्तावना:**

संदर्भातील परिपत्रकाद्वारे प्रसृत केलेल्या सूचनेपैकी पहिली सूचना खालील प्रमाणे आहे.

" कनिष्ठ यंत्रचालक आणि कारागिर "क" (मिटरवाचक) कारागिर "क" (टेलिफोन अटेन्डट) व कारागिर "क" (विद्युत) या सर्व पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता एकच आहे आणि संचालक मंडळाने त्यांचेकडून बहुविधपदांची भूमिका पार पाडण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे ही सर्व पदे समकक्ष असून त्यांची मंडळ निहाय एकच जेष्ठता यादी करण्यात यावी. अशी सुधारित जेष्ठता यादी करताना प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या दि. १६/०५/२००९ या दिवशीच्या स्थितीप्रमाणे सेवाजेष्ठता निश्चित करावी. एकच जेष्ठता यादी तयार करतांना त्यांची शैक्षणिक अर्हता आयटीआय इलेक्ट्रीकल हीच असणे अनिवार्य आहे."

या सूचनेनुसार, वर उल्लेखिलेल्या पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी फक्त आय.टी.आय. इलेक्ट्रीकल ही शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत अशाच कर्मचाऱ्यांचा समावेश एकत्रित जेष्ठता यादीमध्ये झाली आहे.

म.रा.वि.वि.कं.म. वर्गीकरण व सेवाविनियम २००५ मधील तरतूदीनुसार उपरोल्लेखित सर्व पदांची शैक्षणिक अर्हतेबाबतची पूर्वावश्यकता खालील प्रमाणे आहे.

“National Apprenticeship Certificate in respective Trade awarded by the National Council for Training in vocational Trade (NCTVT), New Delhi on completion of National Apperenticeship under the Apprenticeship Act 1961 or National Trade Certificate in the respective trade awarded by the NCTVT, New Delhi, on completion of I.T.I Trade Course.

त्यामुळे, या पदांकरीता आय.टी.आय. इलेक्ट्रीकल व आय.टी.आय. वायरमन या दोन्ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जातो व या पदावर या दोन्ही व्यवसायातील अर्हता धारण करणारे कर्मचारी कार्यरता आहेत.

म्हणून आय.टी.आय. इलेक्ट्रीकल या शैक्षणिक अर्हते प्रमाणेच आय.टी.आय. वायरमन ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा देखील समावेश या एकत्रित जेष्ठता यादीमध्ये होणे आवश्यक असल्याबाबत व पूर्वी दिलेल्या सूचनेमध्ये तशी अंशत: सुधारणा करण्याची बाब काही काळ विचारधीन होती. या बाबतीत साधकबाधक विचारविनिमय होऊन संदर्भातील परिपत्रकामध्ये या परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**:सुधारीत सूचना:**

**संदर्भातील परिपत्रकातील उपरोल्लेखित सूचना क्र. १ मधील शेवटची ओळ खालील प्रमाणे वाचावी.**

**एकच जेष्ठता यादी तयाद करतांना त्यांची शैक्षणिक अर्हता आयटीआय इलेक्ट्रीकल/वायरमन**

**(वीजतंत्री/तारतंत्री) हीच असणे अनिवार्य आहे.**

**संदर्भातील परिपत्रकाद्वारे निर्गमित केलेल्या अन्य कोणत्याही सूचनेमध्ये बदल नाही**

**कार्यकारी संचालक (मा.सं.)**

**प्रती :**
**प्रेषण यादीप्रमाणे कंपनी अंतर्गत कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.**